www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दिवाळी विशेष अंक




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३ अंक : ४३ मंगळवार, दि. २१ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# आमच्याकडे गवताचे पाते आले तरी तलवार बनवण्याची क्षमता!

## आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांचे गौरवोद्गार

**दैनिक युवक आधार**
**उलवे, वार्ताहर**

आजपर्यंतच्या आयुष्यात मी अनेक चढ-उतार पाहिले; परंतु वैरभावाने कुणाशी वागलो नाही. आमच्याकडे माणसे येत गेली आणि आम्ही त्यांना प्रोत्साहन आणि संधी दिली. त्यामुळे अनेकांनी चांगली भरारी घेतली. त्यातीलच एक जयवंत पाटील आहेत. आमच्या कामाची पद्धत अशी आहे, की आमच्याकडे गवताचे पाते आले तरी तलवार बनवण्याची क्षमता आमच्यात आहे. म्हणूनच आम्ही सन्मानाने जगतोय आणि इतरांनाही सन्मान देतोय. जयवंत पाटील यांचा अमृतमहोत्सवी होणारा वाढदिवस कौतुकसोहळा हा त्याचाच एक भाग आहे, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत जयवंत पाटील यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात म्हणाले. हा कार्यक्रम जेएनपीटी वसाहतीतील मैदानात सोमवारी (ता.१९) झाला.

ते पुढे म्हणाले, "जयवंत पाटील हे कुटुंबवत्सल आहेत. त्यांच्या नातवंडांनी, सुनांनी त्यांच्याविषयी बोलणे, हे कौतुकास्पद आहे. त्यांच्या सुना उच्चशिक्षित आणि सुजाण आहेत, तर मुलेही आपापल्या क्षेत्रांत भरारी घेतायत, हे आनंददायी चित्र असून जयवंत पाटील यांनी त्यांच्या आयुष्यात कमावलेली माणसे दिवाळी सण असूनही मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहणे, हे अभिमानास्पद आहे. जयवंत पाटील यांच्याबद्दल माझ्या मनामध्ये प्रेम आणि जिव्हाळा आहे, म्हणूनच मी ब्राझीलवरून थेट त्यांना शुभेच्छा देण्यासाठी या कार्यक्रमासाठी आलो आहे. त्यांनी एनएमजीकेएस संघटनेत उपाध्यक्षपदी सूत्रे घेतल्यानंतर रायगडमध्ये कामगारांसाठी उत्तम काम केले आहे, याची जाण मला आहे."





यावेळी जेएनपीटीचे विश्वस्त दिनेश पाटील म्हणाले, "ते अतिशय विनोद बुद्धीचे असून ते सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांशी मिळूनमिसळून वागतात, पण काँग्रेसशी एकनिष्ठ आहेत."

यावेळी उरण उत्कर्ष समितीचे गोपाळ पाटील म्हणाले, "जयवंत हा माझा मोठा भाऊच आहे, असे संबंध आणि मैत्री आहे. माझ्या राजकीय जीवनात माझा कायम पाठीराखा राहिला आहे."

जयवंत पाटील यांना त्यांच्या मुलांनी आलिशान गाडीतून व्यासपीठावर आणले, तेव्हा तो प्रसंग विलोभनीय होता. टाळ्यांच्या कडकडाटात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत झालेली एन्ट्री चार चांद लावणारी ठरली. यावेळी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पक्षाचा भव्य झेंडा घेऊन त्यांना सलामी दिली. यावेळी जयवंत पाटील यांच्यावर प्रेम करणाऱ्या अनेक क्षेत्रांतील मंडळींनी जेएनपीटी वसाहतीतील मैदान खचाखच भरले होते.

बोकडवीरा काँग्रेस कमिटीचे नेते, न्यू मॅरिटाईम अण्ड जनरल कामगार संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष जयवंत गंगाराम पाटील यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस अत्यंत उत्साही वातावरणात जेएनपीटी वसाहतीत साजरा करण्यात आला.

यावेळी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत, जेएनपीटीचे विश्वस्त दिनेश पाटील, उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाल पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, महाराष्ट्र फिशरमॅन अध्यक्ष मार्तंड नाखवा, उरण तालुका काँग्रेस अध्यक्ष विनोद म्हात्रे, रायगड भूषण एल. बी. पाटील, शिक्षक नेते नरसू पाटील, वैभव पाटील, किरीट पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून जयवंत पाटील यांचा जीवनपट उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला.















# महसूल विभागाचा आहेर कुटुंबावर वेळोवेळी अन्याय

## आहेर यांच्या जमिनीचा लोकोपयोगी सेवेसाठी वापर पण आहेर कुटुंब अन्यायाने त्रस्त होत कर्जबाजारी

## महसूल विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; "पुन्हा अन्याय झाल्यास आत्मदहन" - आहेर यांचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**अकलापूर (ता.संगमनेर)/आण्णासाहेब आहेर:**

मौजे अकलापूर येथील शेतकरी श्री एकनाथ बाळाजी आहेर यांनी आपल्या गट नं. ३८/२ मधील ४ एकर १७ गुंठे जमिनीचे भोगवटादार वर्ग २ वरून वर्ग १ मध्ये रूपांतर करण्याबाबत जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे २० नोव्हेंबर २०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे, आजअखेर महसूल विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यामुळे आहेर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या प्रकरणात महसूल विभागाचा विलंब,दुर्लक्ष व वेळोवेळी अन्याय यावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.१९६९ पासून सुरू झालेला अन्यायाचा प्रवास:श्री आहेर यांच्या कुटुंबावरील अन्यायाची कहाणी आहेर कुटुंबाला नवी नाही,त्यांच्या मूळ मालकीची,भोगवटादार वर्ग एक असलेली सर्वे नं. २२७/५+६+१३+१४+१५ ही जमीन १३ मार्च १९६९ रोजी भू विकास बँक शाखा संगमनेरकडे तारण ठेवण्यात आली होती.

त्या वेळी घेतलेल्या कर्जाची परतफेड पूर्ण होण्यापूर्वीच, ६ फेब्रुवारी १९७० रोजी महसूल अधिकाऱ्यांनी बँकेची परवानगी न घेता चुकीच्या पद्धतीने नियमबाह्य सदर जमीन "लोकोपयोगी सेवेसाठी" घेतली असा गंभीर आरोप आहेर यांनी केला आहे.

"कर्ज आम्ही घेतले, परतफेडही व्याजासह १९८१ साली केली पण जमीन मात्र सरकारने निशुल्क घेतली.जमीन सरकारने घ्यायची आणि कर्ज आम्ही भरायचे.... हा किती मोठा अन्याय आहे याचा विचारही कुणी अधिकाऱ्यांनी केला नाही" व जमीन बँकेकडे तारण असताना कुठल्याही प्रकारचा हस्तांतरण होत नाही तरीही जमिनीचे नियम बाह्य हस्तांतरण करण्यात आले सदर बाबी चौकशी अहवालात समोर आली आहे वेळोवेळी अन्याय करत महसूल विभागाने आम्हाला कर्जबाजारी केल्याचा आक्रोश श्री एकनाथ आहेर यांनी व्यक्त केला.

२००१ साली श्री एकनाथ बाळाजी आहेर यांचा नियमबाह्य जमीन सरकारने हस्तांतर करून लोकोपयोगी सेवेसाठी वापरल्या बाबत पर्यायी जमीन मिळण्याबाबतचा अर्ज केला होता २००८ मध्ये मंजुरी...पण ताबा मात्र २०१५ साली मिळाला:या अन्यायाची दखल घेण्यासाठी २ ऑगस्ट २००१ रोजी श्री आहेर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केला.दीर्घ चौकशीनंतर प्रशासनाने गट नं.३८ मधील ४ एकर १७ गुंठे पर्यायी जमीन मंजूर केली,पर्यायी जमीन विनामूल्य देणे क्रमप्राप्त असतानाही १,४६,००० शासकीय शुल्क १८ मार्च २००८ रोजी वसूल करण्यात आले,सदर जमिनीचा सातबारा तयार झाला तरी ताबा देण्यासाठी तब्बल सात वर्षे विलंब झाला.

जिल्हाधिकारी पोलीस प्रशासन तहसीलदार व विभागीय अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करूनही ताबा प्रक्रिया होत नव्हती शेवटी लोकायुक्त मुंबई यांनी दखल घेत व दैनिक लोकमत यांच्या आयर कुटुंबाचा अन्याय प्रसिद्ध अन्वये महसूल विभागाला खडबडून जाग आली व २७ फेब्रुवारी २०१५ रोजी ताबा मिळाला,तोपर्यंत श्री आहेर शेतकरी कुटुंबाला प्रचंड नुकसान सहन करावे लागले.

आहेर कुटुंबाने जवळजवळ अर्ध आयुष्य सरकारी कार्यालयांच्या उंबरठ्यावर घालवले."असून ज्या कुटुंबाची लोकोपयोगी सेवेसाठी सरकारने नियमबाह्य जमीन वापरून त्या कुटुंबाला कर्जबाजारी करता वेळोवेळी अन्याय करणे कितपत योग्य आहे त्याचे चिंतन महसूल अधिकाऱ्यांनी करणे गरजेचे आहे

आहेर कुटुंबाला मिळालेल्या पर्यायी जमिनीचे गट नं. ३८/२ च्या वर्ग बदलाची मागणी प्रलंबित:सध्या श्री आहेर यांनी गट नं. ३८/२ मधील जमीन भोगवटादार वर्ग दोनवरून वर्ग १ मध्ये रूपांतरित निशुल्क करण्याची मागणी २०/११/२०२३ मध्ये केलेली आहे.

अप्पर जिल्हाधिकारी शिर्डी बाळासाहेब बापूराव कोळेकर यांनी सदर प्रकरणाचा संगमनेर तहसीलदार यांच्याकडून अहवाल मागवला आहे,

तहसीलदार संगमनेर यांनीही आपल्या अहवालात श्री आहेर यांची जमीन लोकोपयोगी सेवेसाठी {गावठाण वर्ग ) वापरण्यात आलेली जमीन ही आहेर कुटुंबाची त्यांचीच मूळ मालकीची होती,भोगवटादार वर्ग एक असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे.

तरीही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून गट नंबर ३८/२ मधील ४ एकर १७ गुंठे जमीन भोगावाटादार वर्ग २ ची भोगवाटादार १ निशुल्क करण्याचे आदेश संगमनेर तहसीलदार यांना निर्गमित झालेले नाहीत.

शेतकरी आहेर कुटुंबाची वेदना : "आता तरी आमची दिवाळी गोड होणार का?"..."ज्या शेतकऱ्याची जमीन सरकारने लोकोपयोगी सेवेसाठी घेतली त्या कुटुंबावर पुन्हा पुन्हा अन्याय.. आम्हाला सरकारने कर्जबाजारी केले आहे असून प्रचंड मानसिक त्रास झालेला आहे व महसूल विभागाच्या चुकीच्या कार्यपद्धतीमुळे आम्ही कर्जबाजारी झालो असून अतोनात नुकसान झाले आहे"असे श्री एकनाथ बाळाजी आहेर यांनी सांगितले,त्यांनी महसूल विभागाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत आत्मदहनाचा इशारा दिला आहे,"पुन्हा अन्याय झाल्यास त्याची जबाबदारी महसूल विभागावर असेल,"असा त्यांचा इशारा असून, त्यांनी प्रशासनाकडून तत्काळ निर्णयाची मागणी केली आहे.

न्यायासाठी शेतकरी आहेर कुटुंबाची लढाई-प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा
गेल्या पाच दशकांपासून न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या आहेर कुटुंबाचा विश्वास पुन्हा जिंकण्यासाठी प्रशासनाने त्वरित निर्णय घेणे अत्यावश्यक आहे,ग्रामीण पठारभागातील,डोंगराळ भागातील कर्जबाजारी कुटुंबा वरील झालेला हा अन्याय दूर करून "शेतकऱ्याला त्याचा हक्काचा न्याय" व नुकसान भरपाई मिळवून देणे हीच खरी दिवाळी ठरेल,अन्यायाची मालिका महसूल विभाग थांबवेल का? व आहेर कुटुंबाला न्याय मिळेल का ? हे पाहणे औचित्याचे ठरेल

महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ ने आहेर कुटुंबाला पाठिंबा दर्शविला असून,महसूल विभागाच्या निष्क्रियतेमुळे शेतकऱ्यांचा विश्वास ढासळतो आहे "श्री आहेर यांची जमीन शासनाने लोकोपयोगी सेवेसाठी नियमबाह्य हस्तांतरित करून मोफत वापरलेली असून पर्यायी जमिनीच २००८ साली सरकारने संपूर्ण शुल्क घेतलेले असताना त्याच जमिनीचे पुन्हा पुन्हा शुल्क घेणे योग्य नाही व एका जमिनीचे दोन वेळा शुल्क घेणे अन्यायकारक आहे* *दरम्यान,जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी या प्रकरणावर दिवाळीपर्यंत न्याय द्यावा अन्यथा महसूल विभागाची चुकीची कार्यपद्धतीवर आवाज उठवत वेळोवेळी अन्याय व श्री आहेर कुटुंबाच्या नुकसानीची भरपाई मिळावी अशी मागणी शासनाकडे केली जाईल महसूल अधिकारी यांनी पळवाटा न काढता सक्षमपणे आहेर कुटुंबाला न्याय द्यावा असे मत महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघटनेचे अध्यक्ष मा.प्रकाश पाटकर यांनी व्यक्त केले आहे

---

## कोल्हापूर जिल्हा रहिवाशी संघ मुंबईकडून पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळी फराळ व मदत वाटप

### धनत्रयोदशी दिवशी कोल्हापूर जिल्हा रहिवासी संघ मुंबई यांनी बळीराजासोबत साजरी केली दिवाळी



**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी**

सामाजिक तसेच जनहिताच्या कार्यात सातत्याने सक्रिय असणाऱ्या कोल्हापूर जिल्हा रहिवाशी संघ, मुंबई महानगर संघटनेने पुन्हा एकदा आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी संघटनेने समाजातून मदत जमा करून दिवाळीच्या निमित्ताने ती गरजूंपर्यंत पोहचवली.

संघटनेच्या वतीने अध्यक्ष श्री. अनिल शालन मारुती पाटील, श्री. अमोल असुळकर, श्री. संभाजी खवनेवाडकर आणि श्री. सागर जाधव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने १८ ऑक्टोबर २०२५ (धनत्रयोदशी) रोजी सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील कांदळगाव, देवगाव तसेच धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील वडनेर आणि देवगाव या गावांना भेट दिली.

या गावांमध्ये नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर बळीराजाची दिवाळी संकटात जाऊ नये, या भावनेतून संघटनेने शेतकऱ्यांना दिवाळी फराळ, आवश्यक वस्तू आणि धान्य स्वरूपात मदत पोहचवली.

या वेळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेत संघटनेचे अध्यक्ष श्री. अनिल शालन मारुती पाटील यांनी सांगितले की,

"महाराष्ट्राचा पोशिंदा असलेला आपला बळीराजा आज संकटात आहे. अतिवृष्टीमुळे त्यांचे आयुष्य विस्कळीत झाले आहे. त्यामुळे सर्व सामाजिक संस्था, संघटना आणि सरकारने एकत्र येऊन मदतीचा हात द्यावा.

राजकीय नेत्यांनीही पुढाकार घेऊन या शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा," असे आवाहन त्यांनी केले.

संघटनेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, खऱ्या अर्थाने ही दिवाळी 'बळीराजासोबतची दिवाळी' ठरली आहे

---

## गवळी समाजाचा इशारा: जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या चार जागा न मिळाल्यास स्वबळावर उमेदवार उभे करू : सरदार प्रकाश चिले

**दैनिक युवक आधार**
**कोल्हापूर (प्रतिनिधी):**

पन्हाळा तालुक्यातील आसुर्ले-पोर्ले व सातवे जिल्हा परिषद मतदारसंघात गवळी समाजाला प्रत्येकी एक जिल्हा परिषद आणि एक पंचायत समिती अशी चार जागांची मागणी करण्यात आली आहे. या मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास गवळी समाज स्वबळावर निवडणुकीच्या रिंगणात उतरेल, असा स्पष्ट इशारा गवळी समाज संघर्ष समितीचे अध्यक्ष सरदार प्रकाश चिले यांनी दिला आहे.

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील या दोन मतदारसंघात गवळी समाजाची मतसंख्या ४२,००० हून अधिक असल्याने हा समाज निर्णायक ठरू शकतो. मात्र, अनेक निवडणुकांमध्ये गवळी समाजाचा वापर केवळ मतदानापुरता केला जात असल्याचा आरोप चिले यांनी केला.



त्याचबरोबर, पन्हाळा पंचायत समितीचे माजी सभापती अनिल कंदुरकर यांच्यावर घराणेशाही, राजकीय लॉबी निर्माण करणं आणि सरकारी-खासगी कंत्राटांमध्ये पक्षपाती वागणूक दिल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला. "प्रत्येक निवडणुकीत कंदुरकर गटाला संधी दिली जाते, हे गवळी समाजावर अन्याय आहे," असं चिले म्हणाले.

चिले पुढे म्हणाले, "जर गवळी समाजाला हक्काच्या चार जागा मिळाल्या नाहीत, तर आम्ही वेगळी राजकीय चुल मांडू. आमचे उमेदवार उभे करू आणि स्वबळावर निवडणूक लढवू." या मागणीसाठी ते जनस्वराज्य शक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आमदार विनय कोरे यांची भेट घेणार आहेत.

गवळी समाजाला संधी दिल्यास स्थानिक स्तरावरील आरोग्य, पायाभूत सुविधा व सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहू, असा विश्वास चिले यांनी व्यक्त केला.

गवळी समाज हा या भागातील महत्त्वाचा आणि प्रभावी घटक आहे. त्यामुळे त्यांच्या असंतोषाचा परिणाम आगामी निवडणुकांवर आणि विशेषतः जनस्वराज्य शक्ती पक्षावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.













दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle





































## शुभ दिपावली एवम् नूतनवर्षाभिनंदन

### राईस मिलर्स असोसिएशन गोंदिया

RMA

| अध्यक्ष | सचिव | कोषाध्यक्ष |
|---|---|---|
| अशोक सी. अग्रवाल | महेश अग्रवाल (माया) | कैलाश अग्रवाल (ककोडी) |

| उपाध्यक्ष | उपाध्यक्ष | उपाध्यक्ष | सहसचिव | सहसचिव | सहसचिव |
|---|---|---|---|---|---|
| रविबाबू अग्रवाल | अशोक बंसल | सर्वेश भुतडा (अर्जुनी मोर.) | दिलीप कारडा | प्रकाश अग्रवाल (गिन्नी) | राहुल एम.अग्रवाल |

**कार्यकारीणी सदस्य**

कृष्णकुमारजी अग्रवाल, प्रकाशजी जायसवाल, सलीमभाई सोलंकी, नरेशजी बगडिया (देवरी), विजय बालारामजी अग्रवाल (आमगांव), दिलीपजी लधानी, आनंद रामेश्वरलालजी अग्रवाल (कोहमारा), अनिलजी शिवदयालजी असाटी (तिरोडा), रितेशजी अग्रवाल (बंटी, आमगांव), पंकजजी अग्रवाल (अन्नपुर्णा), रामअवतारजी अग्रवाल, सचिनजी गहाणे (सौंदड), प्रल्हादजी असाटी (आमगांव), मुकेशजी अग्रवाल (श्री कृष्णा राईस मिल,आमगांव), अमरजी चिमनानी, आलोकजी असाटी, राजीवजी जयपुरिया, हितेशजी बग्गा, मनिषजी अग्रवाल, कमलजी जायसवाल (नवेगाव बांध), विजय सावलरामजी अग्रवाल (आमगांव), निरज बलदेवप्रसाद अग्रवाल, पदमजी अग्रवाल, नितीश गजाननजी अग्रवाल, अविनाशजी गुरनानी, दिनेशजी अग्रवाल (गीता), सागरजी जयसवाल, राजेश बाबुलालजी अग्रवाल, संजयजी अग्रवाल (श्यामधनी), रामप्रकाश राधेश्यामजी अग्रवाल,

**मार्गदर्शक**

दामोदरजी अग्रवाल, गजाननजी अग्रवाल, नंदकिशोरजी असाटी (आमगांव), हुकुमचंदजी अग्रवाल (शुभलक्ष्मी), गोकुलजी फाफट (आमगांव), दिनेशजी दादरिवाल, दिलीपजी असाटी (तिरोडा), शिवशंकरजी खंडेलवाल, हुकूमचंदजी अग्रवाल (मामा), किशनलालजी खंडेलवाल, दिपक मनोहरलालजी अग्रवाल (आमगांव),

**एवं समस्त सदस्यगण, राईस मिलर्स असोसिएशन, गोंदिया**

## !! दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !!

### गोंदिया जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. गोंदिया, र.नं. ०१

श्री. किशोर डोंगरवार, अध्यक्ष — श्री.अशोक बिसेन, उपाध्यक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. गौतम बांते<br>शाखाध्यक्ष, गोंदिया | श्री. विनोद बडोले<br>शाखाध्यक्ष, कोहमारा | श्री. शोभेलाल ठाकुर<br>शाखाध्यक्ष, आमगांव | श्री. संदिप तिडके<br>संचालक जिल्हास्तर |
| श्री. राजेंद्र बोपचे<br>संचालक जिल्हास्तर | श्री.उमेश रहांगडाले<br>संचालक पं.स.गोरेगांव | श्री. दिलीप लोदी<br>संचालक पं.स.अर्जुनी/मोर. | श्री. सतीश दमाहे<br>संचालक पं.स. सालेकसा |
| श्री. राजेश रामटेके<br>संचालक पं.स.देवरी | सौ.भारती तिडके<br>संचालिका जिल्हास्तर | कु. नितु डहाट<br>संचालिका जिल्हास्तर | श्री. ज्योतिप्रकाश गजभिये<br>व्यवस्थापक |

तसेच संस्थेचे लेखापाल, सहाय्यक लेखापाल, अंर्त.तपासणीस, सर्व शाखा-व्यवस्थापक व समस्त कर्मचारी वृंद......

संस्थेची वैशिष्टे :- १) संस्थेचे संपुर्ण कामकाज संगणीकृत, २) नियमित कर्ज मर्यादा २५,००,०००/- रुपये,३) ठेवतारण कर्ज, ठेवीच्या ८०%, ४) संस्थेच्या मृत सभासदांना वेळीच २५०००/- रु. सभासद कल्याण निधीची मदत, ५) सुरक्षा फंड योजने अंतर्गत मृत सभासदांचे वारसदारांना १०,००,०००/- रु. ठरावीक कर्ज माफीची योजना, ६) आधार संजीवनी योजने अंतर्गत (डी.सी.पी.एस.) मृत सभासदांचे ५०००००/-रु. पर्यत कर्ज माफीची योजना. ७)सभासदांना अतिरीक्त ठेव/जिवनसाफल्य ठेव कपात करण्याची संधी व त्यावर आकर्षक व्याजदर.

कर्जावरील व्याजदर ९ %, अतिरीक्त ठेविवरील व्याजदर ७ %, संस्थेत एकुण भागभांडवल रु. १२.२३ कोटी, संस्थेत एकुण ठेवी रु. २४५ कोटी,एकुण कर्जवाटप रु. २५५ कोटी.

श्रध्दा एनर्जी अ‍ॅन्ड इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि

## मॉ.बागेश्वरी साखर कारखाना

वरफळ ता.परतूर जि.जालना

# दीपावली

च्या सर्व ऊस उत्पादक शेतकरी, कर्मचारी,ऊसतोड कामगार व सर्व जनतेस हार्दिक हार्दिक शुभेच्छा



श्री.अजय शिवाजीराव जाधव, संचालक — श्री. अमित शिवाजीराव जाधव, कार्याकारी संचालक — श्री. शिवाजीराव भगवानराव जाधव, चेअरमन

**मॉ.बागेश्वरी साखर कारखाना**

वरफळ ता.परतूर जि.जालना

# सेलू येथे काळ्या बाजारात जाणारा ७ टन रेशन तांदुळासह आयशर वाहन पकडले..!




**दैनिक युवक आधार**
**सेलू (प्रतिनिधी) शिवाजी पवार**

सेलू पोलिसांनी अत्यावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत सेलू इथे मोठी कारवाई केली ज्यात ७ टन रेशन तांदुळासह आयशर वाहन जप्त केले असून तीन जणा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री ९.३० वाजता सेलू परभणी रोडवरील तिरंगा गट्टू कारखाना ते रहमान नगर या रस्त्यावर पोलिसांनाकडून सापळा रचून कारवाई ही करण्यात आली. ज्यात विटकरी रंगाचे आयशर वाहन (MH-22-AA-4391) यातून अंदाजे ७ टन रेशनचा तांदुळ (१४० गोण्या) अवैधरित्या वाहतूक केली जात होती.

या मध्ये महेश बालाजी जाधव वय ३६, रा. क्रांतीनगर, गंगाखेड, जि. परभणी शेख खाजा शेख आमिन (रा. डॉ. झाकीर हुसेन नगर, सेलू युनुसभाई (रा. परतूर, जि. जालना वरील सर्व आरोपींनी संगणमत करून रेशन तांदुळ काळ्या बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करण्यात येतं होती. या कारवाईत सुमारे ₹११.४० लाखांचा मुद्देमाल ज्यात तांदुळ ₹१.४० लाख व वाहन ₹१० लाख या प्रमाणे हस्तगत या करण्यात आले असून या प्रकरणी सेलू पोलीस स्टेशन मध्ये पोलिस उपनिरीक्षक दिगंबर दहिफळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा क्रमांक ५१९/२०२५, कलम ३(७) अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा ए.एस.आय. भिसे यांनी नोंदविला असून याबाबत अधिकचा तपास पोलीस निरीक्षक दीपक बोरसे हे करत आहेत.

ही कारवाई उपनिरीक्षक गणेश पवार, पोलीस कॉन्स्टेबल रासकटला,आणि हेडकॉन्स्टेबल तेलंगे यांनी केली.तर या संदर्भात दुसऱ्या दिवशी अशी चर्चा सेलू परिसरात पाहायला मिळाली की काही राजकीय मंडळी या प्रकरणात गुन्हा दाखल होऊ नये यासाठी प्रयत्नशिल होतें पण याचा काही फारसा परिणाम झाला नाही...

# दिवाळी संध्या संगीतमय कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## सुप्रसिद्ध गायक स्वप्नील बांदोडकर आणि टीमने केले मंत्रमुग्ध

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

भारतीय जनता पार्टी,कळंबोली यांच्या वतीने कळंबोली येथे भव्य दिवाळी संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राग, ताल आणि भावनांची सुरेख संगत दीपउत्सवाची दिवाळी संध्या या संकल्पनेवर आधारित हा संगीतमय कार्यक्रम रसिक श्रोत्यांसाठी एक अनोखी पर्वणी ठरला. दीपावली संध्या हा कार्यक्रम लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून आणि कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर अरुण पाटील यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला. कळंबोली, सेक्टर १६, रोडपाली बस डेपो येथील मैदानावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



या दिवाळी संध्यामध्ये संगीत क्षेत्रातील नामवंत कलाकारांनी आपल्या सुमधुर गायनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. 'राधा ही बावरी' फेम गायक स्वप्नील बांदोडकर, गायिका गुल सक्सेना, गायक के. शिरीष आणि गायिका सपना हेमन या कलाकारांनी मराठी आणि हिंदी गीतांची अप्रतिम प्रस्तुती करत दिवाळीच्या उत्साहाला संगीताची जोड दिली. भारतीय जनता पार्टीच्यावतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमामुळे सामान्य नागरिकांनाही दर्जेदार संगीताचा आस्वाद घेता आला. कळंबोलीच्या जनतेने या संगीतमय दिवाळी संध्या कार्यक्रमाचा आनंद घेत, दिवाळीपूर्वीच सांस्कृतिक मेजवानी अनुभवली. भाजपच्या वतीने आयोजित अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे नागरिकांमध्ये सलोखा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते. या कार्यक्रमावेळी पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेवक बबन मुकादम, राजू शर्मा, रविंद्र भगत, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास भगत, सांस्कृतिक सेल जिल्हा अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, जिल्हा चिटणीस रवी पाटील, महिला मोर्चा जिल्हा अध्यक्षा प्रिया मुकादम, भटके विमुक्त आघाडी जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, माजी जिल्हा सहकार सेल अध्यक्ष अशोक मोटे, सरचिटणीस दिलिप बिष्ट, मंडळ चिटणीस बायजा बारगजे, महिला मोर्चा अध्यक्षा मोनिका महानवर, महिला मोर्चा सरचिटणीस सरस्वती कथारा, दुर्गा सहानी, अपर्णा सरोज, युवा मोर्चा अध्यक्ष गौरव नाईक, युवा मोर्चा सरचिटणीस निशाण गिल, उपाध्यक्ष विनोद बोरसे, मनोरंजनसिंह, सचिव विलास किते, निलेश भोईर, केशव यादव, गुरुनाथ ठाकूर, अमर ठाकूर, दर्शन पाटील, प्रभाग अध्यक्ष राम महानवर, प्रकाश शेलार, घनश्याम शर्मा, विष्णू गायकवाड, संजीत सिंह, मनीष तिवारी, राम पांडे, संजय दोडके, शुभांगी निर्मले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# पनवेलमध्ये शिवसेना उबाठा गटाला हादरा

## पालीमधील उबाठा गटातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

नागरिकांची सेवा करून त्यांच्या समस्या सोडवण्याचा दृष्टिकोन ठेवून काम केले, तर आपली ताकद अधिक दृढ होईल, असे प्रतिपादन लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. पनवेल तालुक्यातील वांगणीतर्फे वाजे ग्रामपंचायत हद्दीमधील पाली गावातील शिवसेना उबाठा गटातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर पक्ष प्रवेश केला. यावेळी त्यांनी सर्व नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची ग्वाही दिली.

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून होत असलेला विकास आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यक्षम नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध पक्षांतील अनेक पदाधिकारी भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर वांगणी विभागातील वाजे ग्रामपंचायत हद्दीतील पाली गावातील शिवसेना उबाठा गटाचे ग्रामपंचायत सदस्य चिंतामणी शेळके यांच्या नेतृत्वाखालील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

हा कार्यक्रम पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, पनवेल पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, भाजप युवामोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, चाहुशेठ म्हात्रे, गुरुनाथ भोईर, प्रविण म्हात्रे, भाजपचे तालुका चिटणीस यतिन पाटील, सतीश शेळके, सतीश मालुसरे, अरुण जळे, महेंद्र भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

पक्षप्रवेशाच्या वेळी आमदार ठाकूर आणि उपस्थित मान्यवरांनी सर्व नवागत कार्यकर्त्यांचे पक्षाच्या शालीने स्वागत केले.या वेळी नयना शेळके, हरेश शेळके, स्वाती शेळके, महेश शेळके, चित्रा शेळके, सुभाष शेळके, भरत भोईर, रेखा भोईर, बारक्या शेळके, हनुमान शेळके, नितीन शेळके, भगवान शेळके, मच्छिंद्र शेळके, शाम शेळके, राम शेळके, जानवी शेळके, अजय शेळके, गुलाब शेळके, वैशाली शेळके, स्वस्तिका शेळके, वैजंती शेळके, संतोष शेळके, प्रशांत भोईर, बारकी शेळके, कुणाल शेळके, इंद्राबाई शेळके, निलम भोईर यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते 'दैनिक किल्ले रायगड'च्या ५९ व्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

ज्येष्ठ पत्रकार प्रमोद वालेकर संपादित दैनिक किल्ले रायगडच्या ५९ व्या दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आज संपन्न झाले. या प्रसंगी त्यांच्यासोबत सहसंपादक प्रदीप वालेकर, व्यवस्थापक तुषार तटकरी, सा. रायगड प्रभातचे संपादक विजय पवार, प्रसिद्धी प्रमुख हरेश साठे, पत्रकार उमेश भोईर, आदी उपस्थित होते.

या प्रसंगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दैनिक किल्ले रायगडचा दिवाळी विशेषांक दरवर्षी वजनदार लेखकांच्या लेखणीतून साकारत असल्याचे अधोरेखित केले. यंदाचाही अंक परिपूर्ण व दर्जेदार झाल्याची पावती त्यांनी किल्ले रायगडच्या टीमला दिली.दर्जेदार साहित्यातूनच उत्कृष्ट अंकांची निर्मिती होत असते. त्या परंपरेला वृद्धिंगत आणि टिकवून ठेवण्यासाठी किल्ले रायगडच्या संपादकीय टीमने घेतलेली अपार मेहनत या अंकातून स्पष्ट जाणवते, असे मत लोकनेते ठाकूर यांनी व्यक्त केले. स्वर्गीय ल. पा. वालेकर हे पत्रकारिता क्षेत्रातील आधारस्तंभ होते, त्यांचा वारसा पुढे चालविण्याचे काम त्यांचे कुटुंबीय करीत आहेत असे सांगतानाच किल्ले रायगड साहित्यिकांची परंपरा महाराष्ट्रभर मांडण्याचे काम करीत असल्याचे गौरवोदगारही त्यांनी यावेळी काढले.

या विशेषांकामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि समकालीन विषयांवर विविध मान्यवर लेखकांचे लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. दरवर्षीप्रमाणेच यंदाचा अंकही वाचकांना विचारप्रवृत्त, प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक ठरणार आहे, असा विश्वास किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर यांनी व्यक्त केला.

# राजीव गांधी महाविद्यालयात भितीपत्रकाचे अनावरण




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथील वाणिज्य विभागातर्फे भितीपत्रक अनावरणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अनावरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए टी शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले विद्यार्थिनीं कुमारी रिंकू हावळे यांनी भितीपत्रक तयार करून डॉ एपीजे अब्दुल कलाम यांनी आपल्याला व्यावसायिक जीवनाबद्दल काय शिकविले व त्यांनी लिहिलेल्या प्रेरणादायी पुस्तकातून कशाप्रकारे आपणास प्रेरणा मिळतात त्याविषयी माहितीपूर्ण मांडणी केली.

दत्ता मुंगल यांनी डॉ एपीजे अब्दुल कलाम आणि त्यांच्या प्रेरणादायी पुस्तकांची यादी यावर आकर्षक भितीपत्रक तयार केले तर विठ्ठल पावडे व भागवत पावडे यांनी त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

विद्यार्थ्यांनी आपल्या भीती पत्रकाचे सादरीकरण करताना विषयाचे सखोल ज्ञान आणि सर्जनशीलता दाखवली प्राचार्य डॉ ए टी शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना अशा शैक्षणिक आणि सर्जनशील उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ शिवराज कदम यांनी केले तर कार्यक्रमाचे संचालन डॉ साहेब हनुमंते यांनी केले या कार्यक्रमास महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ कोंडेकर आर एस तसेच राजीव गांधी महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनाचे अध्यक्ष डॉ मारोती देशमुख , स्पोर्ट डायरेक्टर डॉ अर्जुनसिंह ठाकूर व डॉ अरुण कुमार जाधव, इतर प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केळवणे गावातील तरुणांनी केली उत्साहात स्वच्छता मोहीम

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

केळवणे -पनवेल /२० ऑक्टोबर २०२५ आजकाल कित्येक गावांची कचरा ही मोठी समस्या झाली आहे, कारण कचरा म्हणजे अनेक रोगांना आमंत्रण असते. सरकार सुद्धा स्वछता अभियांनांतर्गत अनेक वेळा जनजागृती करत असते...

परंतु आपले गाव आपली जबाबदारी या विचाराने केळवणे गावातील काही होतकरू तरुणांनी एकत्र येऊन स्वछतेचे काम सुरु करण्याचा विचार करून या उपक्रमाला सुरवात केली.त्याबद्दल गाव स्वच्छतेसाठी प्रयत्नशील असणारे सरपंच तथा ग्रामपंचायत यांनी या सर्वांचे कौतुक केले आहे.

यात मुख्यता केळवणे गावातील विजय ठाकूर, प्रणय मोकल,सागर मोकल,आदेश ठाकूर,साईराज पाटील,एम. के.कोळी,ब्लॉगर सागर पाटील ,शुभम पाटील,सर्वेश पाटील,सार्थक पाटील या तरुणांनी पत्रकार अजय शिवकर यांच्या मार्गदर्शनात स्वछता मोहीम राबवून गावाच्या प्रवेशाजवळील रस्त्याची साफसफाई करून कचरा जमा करून त्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावून सर्वांना आरोग्याचा संदेश दिला आहे.

संत गाडगेबाबा यांच्या विचारसरणीचा सन्मान ठेवून गाव स्वच्छ व सुंदर बनविण्याची या तरुणांनी जणू स्वच्छतेची शपथ घेतली आहे.

मुख्य म्हणजे वशेणी गावचे शिक्षक /साहित्यिक म का म्हात्रे यांनी या मुलाचे कौतुक करून या कार्यात सक्रिय सहभाग दाखवून हातभार लावला, तसेच गावातील सामाजिक कार्यकर्ते उद्योजक अनंत माळी यांनी सर्वांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था केली.

सर्व स्तरातून या तरुणांचे कौतुक केले जात आहे.



# लाईनमनकडून शेतकऱ्याच्या शेतातील वडिलोपार्जित लिंबाचे झाड तोडल्याने संताप !

## विद्युत वितरण कंपनीच्या लाईन मनविरुद्ध शेतकऱ्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

रिसोड : तालुक्यातील दापूरी खुर्द येथील शेतकरी संतोष वामन भालेराव यांनी आपल्या शेतातील २०वर्षे जुने वडिलोपार्जित लिंबाचे झाड विद्युत वितरण कंपनीच्या लाईन मध्ये मशीनच्या सहाय्याने कापून टाकण्याची तक्रार जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे . ही घटना दिनांक २१सप्टेंबर २०२५ रोजी घडली असून, शेतकऱ्यांने प्रशासनाकडे न्याय मागणी केली आहे.

घटनेचा सविस्तर तपशील: संतोष भालेराव हे दापुरी खुर्द गावचे रहिवाशी असून, त्याचे वडील वामन सूर्यभान भालेराव (वय 80 वर्ष) यांच्या नावावर गट क्रमांक ९१व ९२अशी शेती आहे.

गट क्रमांक ९१ मधील शेतात विद्युत तारे जवळ असलेले मोठे लिंबाचे झाड सुमारे 20 वर्षापासून उभे होते. मात्र दिनांक २१सप्टेंबर २०२५ रोजी चंद्रशेखर नावाच्या लाईनमनने, कोणतीही पूर्व सूचना न देता, मशीनच्या सहाय्याने झाड पूर्णपणे तोडून टाकले.

झाड तोडताना शेतात सोयाबीनचे पीक असतानाही, कोणतीही काळजी न घेता झाड येतात पाडण्यात आले. यामुळे पिकाचे नुकसान झाले असून, शेतकऱ्याच्या भावनांनाही धक्का बसला आहे.



**शेतकऱ्याची मागणी:**

अर्जदार संतोष भालेराव यांनी जिल्हाधिकारी वाशिम यांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की- "हे झाड आमच्या कुटुंबाचे वडिलोपार्जित होते. विद्युत वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी कोणतीही पूर्व सूचना न देता झाड कापून आमचे आर्थिक आणि मानसिक नुकसान केले आहे. त्यामुळे चौकशी करून दोषी लाईनमन वर कारवाई करण्यात यावी आणि नुकसान भरपाई मिळावी."स्थानिक ग्रामस्थांचा रोष: या घटनेनंतर दापुरी खुर्द परिसरात संतापाचे वातावरण असून, ग्रामस्थांनी म्हटले आहे की-"विद्युत विभागाचे कर्मचारी शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय झाडे कापतात, पिकांची हानी करतात. अशा बेफिकीर कामकाजाला आळा बसावा".

स्थानिकांनी मागणी केली आहे की प्रशासनाने त्वरित चौकशी करून संबंधित लाईन मनवर शिस्त भंग कारवाई करावी.

**प्रशासनाकडून चौकशीची मागणी**

शेतकऱ्याची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाल्यानंतर प्रशासन मात्र मूक आहे. महसूल विभाग आणि विद्युत वितरण कंपनीकडून संयुक्त पंचनामा करून प्रकरणाची सखोल चौकशीची करण्यात आली आहे.पर्यावरणीय हानीचा मुद्दा:

तज्ञांच्या मते, अशाप्रकारे परवानगी शिवाय झाडे तोडल्यास पर्यावरणीय नुकसान होते.२० वर्ष जुने लिंबाचे झाड स्थानिक जैवविविधतेसाठी महत्त्वाचे होते, त्यामुळे प्रशासनाने भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी ठोस पाऊले उचलावित, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पत्रकार उत्कर्ष समिती व दैनिक युवक आधार च्या वतीने उरण शहरात अनोखा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**उरण शहर प्रतिनिधी/ सायली साळूंके**

सण-व्रत-वैकलय याची परंपरा असणाऱ्या आपल्या भारतीय संस्कृती मध्ये वर्षाचे बारा महिने कोणताना कोणता सण असतोच, आपण सारेजण तो साजरा करण्यात गुंग असतो परंतु आपण साजरा करत असताना कळतनकळत सामाज्यांतील खरे सेवक हे आपले सण आपल्याला आनंदाने साजरे करता यावेत यासठी स्वतः सण साजरे न करता आपल्या कर्तव्याची अमल बजावणी करण्या सठी तत्पर असतात परंतु आपल्या पासून दुर्लक्षित राहतात आपल्या कर्तव्याची अमलबजावणी हाच त्यांचा खरा सण असतो त्यांच्या या कर्तव्यदक्ष सेवेची दखल घेत “पत्रकार उत्कर्ष समिती उरणच्या अध्यक्षा पूजा चव्हाण व पत्रकार उत्कर्ष समितीच्या सदस्या तथा दैनिक युवक आधारच्या उरण कार्यालय प्रमुख सायली साळुंके” यांनी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत शहरातील नागरिकांचे आरोग्य सुव्यवस्थित राहण्यासाठी साठी झटणारे आस पासच्या परिसरातील सफाई कामगार व दिवाळी सणात आपल्या गावोगावी राहणाऱ्या परिवारात जाऊन आपल्याला सण साजरे करता यावेत यासाठी सुखरूप आणि वेळेवर पोहचविण्या साठी स्वतः आपल्या परिवारापासून लांब राहून कर्तव्यावर हजर असणारे राज्य परिवहन मंडळाचे वाहक व चालक यांना त्यांच्या कर्तव्याच्या ठिकाणी जाऊन गुलाब पुष्प व दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांचा सन्मान केला. या उपक्रमातून दिवाळी सणाचा आनंद समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.असल्याचे पूजा चव्हाण म्हणाल्या. या त्यांच्या सामाजिक संवेदनशील उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांच्या अशा कृतीतून प्रेरणा घेऊन दिवाळी सणाच्या या आनंददायी उपक्रमात सहभागी होण्याचा संकल्प उरणातील अनेक नागरिकांनी या वेळी व्यक्त केला आहे.



आज सकाळ पासून शहरातील विविध ठिकाणी कार्यरत असलेल्या साफसफाई कर्मचाऱ्यांना आणि बस वाहक व चालकांना भेटून त्यांना गुलाबपुष्प देत शुभेच्छा देण्यात आल्या. या छोट्या पण हृदयस्पर्शी कृतीमुळे समस्त कर्मचार्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले होते.

यावेळी कर्मचार्यांनी या अनोख्या उपक्रमाचे स्वगत केले आणि उरणात प्रथमच आमच्या सारख्या कर्मचाऱ्यांची कुणीतरी दखल घेतली याचा आनंद व्यक्त करीत पत्रकार उत्कर्ष समितीउरणच्या च्या अध्यक्षा पूजा चव्हाण व पत्रकार उत्कर्ष समितीच्या सदस्या तथा दैनिक युवक आधारच्या उरण कार्यालय प्रमुख सायली साळुंके यांचे आभारव्यक्त केले. “आपल्या दैनंदिन जीवनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या कर्मचाऱ्यां विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे प्रकाश, आणि तो फक्त घरात नव्हे तर प्रत्येकाच्या मनातही उजळायला हवा.”अशी प्रतिक्रिया उरण च्यानागरिकांनी व्यक्त करून यापुढे या सामाजिक संवेदनशील उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करीत अनेकांनी अशा कृतीतून प्रेरणा घेऊन दिवाळी सणाच्या या आनंददायी उपक्रमात सहभागी होण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

## गावाच्या विकासाची नवी दिशा दाखवणारे तरुण सरपंच — सागर आमले

**दैनिक युवकआधार**

**अंभोरा (ता. आष्टी) — बाळासाहेब रकटाटे**

कोणत्याही गावाचा विकास हा केवळ योजना राबवून होत नाही, तर त्यासाठी समर्पित नेतृत्व आणि लोकाभिमुख विचारांची गरज असते. अशाच ध्येयाने गावाच्या प्रगतीचा मार्ग सुकर करणारे अंभोरा ग्रामपंचायतीचे कार्यक्षम सरपंच सागर आमले हे आज संपूर्ण परिसरात प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात.

त्यांच्या नावासोबत आता राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार ही मानाची उपाधी जोडली गेली असून, ती त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देते.

**तरुणाईतून नेतृत्व — आणि समाजासाठी समर्पण**

सागर आमले यांनी अत्यंत कमी वयात सरपंच पदाचा कार्यभार स्वीकारला. तरुणाईची उर्मी, समाजसेवेची ओढ आणि गावाचा विकास साधण्याचे ध्येय या सर्वांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यातून दिसून येतो. त्यांनी गावाच्या प्रत्येक विकास आराखड्याला लोकसहभागाचा नवा आयाम दिला आहे.

गावातील शेतकरी, महिला बचतगट, युवक मंडळे यांना एकत्र करून ग्रामविकासाचे सामूहिक स्वप्न त्यांनी साकार केले आहे.



गावाच्या विकासाची यशस्वी सूत्रे सरपंच झाल्यानंतर सागर आमले यांनी अनेक कल्पक योजना राबवून अंभोऱ्याला प्रगतीच्या दिशेने नेले आहे.

**त्यातील काही उल्लेखनीय कामे अशी —**

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून नळयोजना व पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली, ज्यामुळे गावकऱ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध झाले.

गावात मोफत पीठ गिरणी व कुट्टी मशीन सुरू करून शेतकऱ्यांचा खर्च कमी केला शिवरस्त्यांचे गावातील , तसेच शाळेतील भौतिक सुविधा सुधारणा — यामुळे गावाचे एकूण सौंदर्यच बदलले आहे. गावात वॉटर सप्लाय लाइन नव्याने बसविण्याचे काम करून दीर्घकाळ प्रलंबित समस्या सोडवली. शेती, शिक्षण आणि आरोग्य यांचा संगम सागर आमले यांनी गावातील शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडण्यासाठी आठवडी बाजार सुरू केला. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळावा यासाठी त्यांनी शेतमाल विक्री संकल्पना राबवली.

तसेच, गावातील शाळांना भौतिक सुविधा, डिजिटल क्लासरूम, पिण्याच्या पाण्याची सोय, खेळाची साधने आणि वृक्षारोपण यांसारख्या अनेक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी वातावरण मिळाले आहे.गावात आजारी नागरिकांसाठी प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिरे, मोफत औषध वितरण, आणि वैद्यकीय सल्ला शिबिरे आयोजित करून आरोग्याबाबत जनजागृती केली. समाजकारणातून निर्माण झालेली विश्वासार्ह ओळख संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मराठा आरक्षण चळवळीत सागर आमले यांनी सक्रिय सहभाग घेतला. गावोगाव फिरून जनजागृती केली, अनेक मोर्चांमध्ये उपस्थित राहून तरुणांना एकत्र केले.

त्यांच्या या समर्पणामुळे ते आज मराठा समाजातील जागरूक व संवेदनशील नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

**गावाच्या विकासासह वैयक्तिक प्रगतीचे सुंदर संतुलन**

अहमदनगर येथे त्यांनी स्वतःचा यशस्वी उद्योग उभारून स्वावलंबनाचा आदर्श ठेवला आहे. व्यावसायिक यश असूनही त्यांनी समाजसेवा कधीही सोडली नाही. गावातील प्रत्येक घटक — शेतकरी, महिला, विद्यार्थी, तरुण — यांच्या जीवनात काहीतरी सकारात्मक बदल घडविण्याचा त्यांचा प्रयत्न कायम असतो. पुरस्कार आणि गौरव ही त्यांच्या सेवाभावाची साक्ष त्यांच्या विकासनिष्ठ कार्याची दखल घेत सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर केला आहे.

हा पुरस्कार त्यांच्या नेतृत्वगुणांचा, सेवाभावाचा आणि कार्यक्षमतेचा सन्मान आहे.

प्रेरणादायी व्यक्तिमत्वाची ओळख सागर आमले हे केवळ सरपंच नाहीत, तर एक जननेता, समाजसेवक आणि आपल्या गावाचा अभिमान आहेत. त्यांच्या कार्यामुळे अंभोरा हे गाव प्रगतीच्या मार्गावर ठामपणे पुढे जात आहे.

**त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व ग्रामस्थ आणि शुभेच्छुकांकडून त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा —**

"सागर आमले सरपंच — तुमचा सेवाभाव, तुमची कार्यतत्परता आणि तुमचे नेतृत्व अनेकांना प्रेरणा देणारे आहे.

आपल्या कार्याची वाटचाल अशीच अखंड सुरू राहो,

हीच सर्वांची शुभेच्छा!"



**आष्टी - आ. सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते तेजवार्ता च्या 22 व्या दिवाळी अंकाचे प्रकाशन संपन्न झाले यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष रमेश गाढवे, मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष तान्हाजी जजीरे, हनुमंत गाढवे, राजाभाऊ शेळके, कांतिलाल पानसरे, संपादक बबलु भाई सय्यद, पत्रकार अविनाश कदम, प्रविण पोकळे, जावेद पठाण, यशवंत हंबर्डे, सचिन रानडे, अक्षय विधाते, संतोष नागरगोजे, मारूती संत्रे, शेख हमजान आदी दिसत आहेत.**

**( दैनिक युवक आधार)**

## सीताबर्डीमध्ये रंगली दिवाळी पहाटनिमित्त सूरतालांची मैफल

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सतीश कडू संपादक नागपूर विभाग**

**नागपूर:** सीताबर्डी मेन रोड वरील बुटी प्राचीन महाद्वार येथील सीताबर्डी व्यापारी संघ व सीताबर्डी मित्र मंडळ यांच्या संयुक्तविद्यमाने नरक चतुर्दशीच्या मुहुर्तावर भव्य संगीतमय दिवाळी पहाट कार्यक्रम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे धरमपेठ भागाचे सरकार्यवाह मोहन देशपांडे, नागपूर नागरीक बँकेचे अध्यक्ष प्रा. संजय भेंडे, माजी नगरसेवक संजय बंगाले, ॲड निशांत गांधी आदी उपस्थित होते. याप्रसंगी गायक कलावंतांनी सुमधूर भक्तीगीत, भावगीतांचे सादरीकरण केले. दिवाळी पहाटचा आनंद घेण्यासाठी सीताबर्डी परिसरातील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते श्याम ताम्हणकर, फुलमती अवचट यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या आयोजनात जगदीश अरोरा यांची महत्वाची भूमिका होती. कार्यक्रमाचे संचालन अमोल तपासे यांनी केले. आभार व्यापारी संघाचे सचिव हुसैन अजानी यांनी मानले.

## पोलिस हुतात्मा दिन

आज २१ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत - तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाच्छादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण रहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक व हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उजाळा दिला जातो.



२४ तास ऑन ड्युटी असे पोलिसांचे वर्णन केले जाते. कारण जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात गणेशोत्सव असो की नवरात्र, दसरा असो की दिवाळी, ईद असो की नाताळ देशातील जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी ते कायम तत्पर असतात. जेंव्हा आपण आपल्या कुटुंबासोबत हे सण साजरे करत असतो, तेंव्हा ते आपल्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने साजरे करू शकतो. मोर्चे, आंदोलने, निवडणुका पोलिसांशिवाय पार पडूच शकत नाही. मोर्चे, आंदोलने, निवडणुकीसाठी कायम पोलीस बंदोबस्त तैनात असतो. कोणतीही आपत्ती येऊ मग ती निसर्ग निर्मित असो की मानव निर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलिसच हजर असतात.

पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६ / ११ च्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबईकरांचा जीव वाचवला.

१९९२ साली मुंबईत झालेल्या जातीय दंगलीतही पोलिसांचे कार्य अतुलनीय असेच होते. कोरोना सारख्या महामारीत तर पोलिसांचे महत्व आणखी अधोरेखित झाले. देशवासियांना कोरोनाच्या महामारीपासून वाचवण्यासाठी पोलिसांनी जे कार्य केले त्याला तोड नाही. कोरोनाने हजारो पोलिसांचा बळी घेतला तरीही पोलीस आपल्या कर्तव्यापासून तसूभरही हलले नाहीत.

पंतप्रधानांनी त्यांना त्यांच्या या कार्यासाठी कोव्हिड योद्धा ही उपाधी दिली होती. पंतप्रधानांनी पोलिसांना दिलेली कोव्हीड योद्धा ही उपाधी सर्वार्थाने योग्य होती.

देशातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपल्या कुटुंबाची पर्वा न करता बारा ते अठरा तास प्रसंगी सुट्टी न घेता कर्तव्यावर राहून मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी अनेक पोलीस जवान शहीद होतात.

दहशतवादी, नक्षलवादी यासारख्या देशविघातक शक्तींविरुद्ध लढताना काहींना वीरमरण येते. अशा शहीद जवानांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे देशातील प्रत्येक नागरिकांचे कर्तव्यच आहे.

या दिवशी सरकारच्या वतीने पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद पोलीस जवानांना मानवंदना दिली जाते. हा दिवस देशातील सर्व पोलीस जवान, अधिकारी, कर्मचारी यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व पवित्र आहे. पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन !

**- श्याम ठाणेदार**

# महावितरण च्या निष्काळजीपणामुळे गमवावा लागला एका तरुणाला जीव अनेक आदिवासी संघटना रस्त्यावर

## आदिवासी शक्ती सेना व आदिवासी उलगलून सेनेच्या आवाजानंतर दिंडोरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**

**(पिंपळगाव बसवंत)** : मोहाडी येथे दुर्दैवी घटना घडली. सय्यद पिंप्री येथील दीपक बाळू पोटींदे वय 32 हा डैम्ठ महावितरण चे कॉन्ट्रॅक्टर व लाईनमन यांच्या निष्काळजीपणामुळे दीपक यास आपला जीव गमवावा लागला.

याबाबत सविस्तर धनंजय बाळू पोटिंदे वय 30 राहणार उमाजी नगर सय्यद पिंपरी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मयत दीपक बाळू पोटिंदे हा गेल्या काही वर्षापासून डैम्ठ कॉन्ट्रॅक्टर अनिल निफाडे व गणेश कापसे यांच्याकडे काम करत होता दिनांक 18/ 10 /2025 रोजी धनंजय पोटिंदे यास अनिल निफाडे यांचा संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास फोन आला व तुझा भाऊ पोलवरून पडला आहे तू लवकर शासकीय रुग्णालय पिंपळगाव बसवंत येथे येण्यास सांगितले धनंजय पोटिंदे व मित्र परशुराम महाले दोघे मोटरसायकलवर शासकीय रुग्णालय येथे गेले असता दीपक पोटिंदे हा मयत असल्याचे समजले .




दीपकच्या अंगावर भाजलेल्या मोठ्या स्वरूपात जखमा होत्या दीपक सोबत काम करणारे धोंडू शेवरे, सागर शेवरे, संजय वाघमारे, भूषण पवार यांचेकडे धनंजय पोटिंदे यांनी अधिक चौकशी केली असता त्यांनी सांगितले सकाळी नऊ वाजेपासून ठेकेदार अनिल निफाडे यांचे सोबत मोहाडी शिवार येथे जानोरी रोड जवळ सुदाम पांडुरंग मौले यांचे शेतात नवीन लाईन ही जुनी लाईनला जोडणाऱ्या डीपी स्ट्रक्चर चे काम करत होतो नवीन लाईन ही जुनी लाईनला जोडायची असल्याने डैम्ठ चे मोहाडी सब स्टेशनचे लाईनमन आवारे हे देखील तेथे हजर होते. लाईनमन आवारे यांनी सहाय्यक अभियंता मोहाडी यांना मोबाईल वरून सबस्टेशन येथे फोन करून ऑपरेटरला वीज प्रवाह बंद करण्यासाठी सांगितले.

परंतु सायंकाळी सहा वाजेच्या दरम्यान ठेकेदार अनिल निफाडे व लाईनमन आवरे यांनी दीपक पोटिंदे याला जुने लाईनचा जंप खोलण्यासाठी पोलवर चढण्यात सांगितले दीपक पोटिंदे यांनी कॉन्ट्रॅक्टर अनिल निफाडे व लाईनमन आवारे यांना दोन वेळा वीज प्रवाह बंद केलेला आहे का याबाबत विचारणा केली असता त्यांनी वीज प्रवाह बंद केलेला आहे असे सांगितले.

परंतु दीपक पोटिंदे हा जंप खोलण्यासाठी इलेक्ट्रिक पोलवर चढला असता कॉन्ट्रॅक्टर निफाडे यांनी त्यास हॅन्ड ग्लोज, हेल्मेट, सुरक्षा बूट अशी कुठलेही विद्युत रोधक वस्तू दिली नाही तो पोलवर कामासाठी चढला असतात त्यास विजेचा जोरदार शॉक लागून तो भाजला जाऊन पोलवरून खाली पडला.

त्यानंतर त्यास पिंपळगाव येथे शासकीय रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले.

ही बातमी वाऱ्यासारखी पसरली असता आदिवासी शक्ती सेनेचे अध्यक्ष अर्जुन भाऊ गांगुर्डे हे तातडीने घटनास्थळी दाखल होऊन सदरील घटनेची चौकशी केली.

एक आदिवासी कुटुंबातील कामगार याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे या घटनेची दखल घेत महावितरण अधिकारी व कॉन्ट्रॅक्टर यांच्यावर गुन्हा दाखल करून मयत व्यक्तीस न्याय मिळवून द्यावा हि पोलीस प्रशासनास विनंती केली. या अर्जाची दखल घेत दिंडोरी पोलीस ठाणे येथे .

कॉन्ट्रॅक्टर अनिल निफाडे दावचवाडी लाईनमन आवारे दिंडोरी नाशिक ग्रामीण , MSEB सब स्टेशन मोहाडी येथील ऑफिस दिंडोरी नाशिक ग्रामीण यांच्यावर भारतीय न्यायसंहितेच्या बी एन एस 2023 प्रमाणे कलम 106/1, 3/5 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यावेळेस आदिवासी शक्ती सेना अध्यक्ष अर्जुन गांगुर्डे महात्मा रावण किंग फाउंडेशन अध्यक्ष दत्तू झनकर सह मयत दीपक पोटिंडे यांचे कुटुंबीय बाळू पोटिंदे, धनंजय पोटिंदे,ज्योती पोटिंदे, सुमन पोटिंदे सह असंख्य नागरिक उपस्थित होते.

# पनवेलमध्ये गोदरेज कॅपिटलची नवीन गृहवित्त मोहीम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपची वित्तीय सेवा शाखा असलेल्या गोदरेज कॅपिटलने त्यांच्या उपकंपनी गोदरेज हाऊसिंग फायनान्समार्फत 'पक्कापता' अर्थात मालकीचे घर ही नवीन मोहीम सुरू केली आहे. पनवेलसह देशातील उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये परवडणाऱ्या गृहवित्त उपाययोजना पुरवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

ही मोहीम पहिल्यांदा घर खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या भावनिक प्रवासाचे सुंदर चित्रण करते. तसेच भाड्याच्या जागेतून स्वतःच्या मालकीच्या घरात जाण्यासाठी गोदरेज हाऊसिंग फायनान्सला एक विश्वासार्ह भागीदार म्हणून मान्यता देते.या मोहिमेच्या केंद्रस्थानी एक साधा, सोपा पण सखोल दृष्टिकोन आहे: 'पक्कापता' म्हणजेच कायम स्वरूपी पत्ता, हे भारतीय कुटुंबांचे सर्वात मोठे स्वप्न असते. पारंपरिकपणे घर खरेदीसाठी चांगला मुहूर्त म्हणून दिवाळी आणि धनत्रयोदशीचे महत्त्व लक्षात घेत ही मोहीम धोरणात्मक रित्या आखण्यात आली आहे. परवडणाऱ्या गृहनिर्माण वित्तपुरवठ्यासाठी ग्राहक-



प्रथम दृष्टिकोन अधोरेखित करून या मानसिकतेचा फायदा करून घेण्याचा कंपनीचा उद्देश आहे, ज्यामुळे टियर-२ शहरांमध्ये घर घेणे अधिक सोपे होईल. कारण तेथील घरे आता परवडणाऱ्या दरांमध्ये उपलब्ध आहेत.

# जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था,अध्यक्ष श्री. प्रितमदादा म्हात्रे यांच्या शुभहस्ते सुनील वारगडा संपादित सा.आपले रायगड दिवाळी देवस्थान अंकाचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :**

आपले रायगड गेल्या 4 वर्षांपासून पनवेल, नवी मुंबई, रायगड जिल्ह्यातून नियमितपणे प्रकाशित होणारे लोकप्रिय *साप्ताहिक आपले रायगड* यावर्षीच्या दिवाळी देवस्थान विशेषांकाचे प्रकाशन सोमवार, दिनांक 20 ऑक्टोबर २०२५ रोजी जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था,अध्यक्ष श्री. प्रितमदादा म्हात्रे यांच्या शुभहस्ते सा.आपले रायगड दिवाळी देवस्थान अंकाचे प्रकाशन करण्यात आले.आपले रायगड दिवाळी देवस्थान अंकास जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था,चे अध्यक्ष श्री. प्रितमदादा म्हात्रे दिवाळी अंकास शुभेच्छा दिल्या व म्हणाले की गरिबापासून ते श्रीमंतापर्यंत अडचण आल्यापासून ते अडचण सोडवण्यापर्यंत हे सगळे



पत्रकार बंधू काम करत असतात. काही वेळेला असं असतं की एखादं सेन्टेस चुकलं की आपण त्या पत्रकारांना आपण त्यांना बोलतो. परंतु त्याच्या मागच्या भावना आपण समजून घेतल्या पाहिजेत. या कार्यक्रमाला पत्रकार संजय कदम,मयूर तांबडे, गणपत वारगडा, संतोष भगत, शंकर वायदंडे,रवींद्र गायकवाड,अनिल कुरघोडे,सुनील पाटील,श्री. अडसुळे,सनीप कलोते, दिपाली पारसकर,असीम शेख, रवींद्र पाटील तसेच 'आपले रायगड 'चे संपादक सुनील वारगडा आदी मान्यवर उपस्थित होते. आपले रायगड दिवाळी देवस्थान विशेषांकाचे या वर्षीचे मुखपृष्ठ श्री क्षेत्र पंचायतन मंदिर देवस्थान चर्चेचा विषय ठरला. मुखपृष्ठावर नढाल, खालापूर येथील श्री क्षेत्र पंचायतन मंदिराच्या पार्श्वभूमीवर हे मंदिर उभारले आहे. आपले रायगड हे वृत्तपत्र गेली अनेक वर्षे नवी मुंबई, रायगड जिल्ह्यातील घडामोडी,सामाजिक प्रश्न, तसेच नागरिकांच्या हिताच्या बातम्या मांडत आले आहे. सुनील वारगडा यांनी पत्रकारितेतील प्रामाणिकपणा आणि समाजाशी असलेली बांधिलकी यावर नेहमी भर दिला आहे. गेली 4 वर्षे ते सतत आणि निष्ठेने पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्य करत आहेत.

> यावर्षी आपले रायगड दिवाळी देवस्थान अंक काढलेला आहे.त्याला स्थान श्री क्षेत्र पंचायतन मंदिर आपण या विशेषांकात दिलेले आहे आणि खरोखर श्री क्षेत्र पंचायतन मंदिर पाचही देवांतर्फे मी मागणी करतो, की आपण असेच पुढे जाऊन *आपले रायगड* हे नक्कीच चांगल्या भावना आणि नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी, सत्याची बाजू मांडण्यासाठी आपण नेहमी अग्रेसर राहावं..या पुढील वाटचालीस शुभेच्छा
>
> - जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था,चे अध्यक्ष श्री. प्रितमदादा म्हात्रे

# राजमाता जिजाऊ उद्यानाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले लोकार्पण

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर हरिश्चंद्र पाटील, आयुक्त सौरभ राव यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**ठाणे :** ठाण्यात विविध संकल्पनांवर आधारित उद्यानांचा विकास करण्यात येत आहे. त्यापैकीच एक अशा राजमाता जिजाऊ उद्यान म्हणजेच ऑक्सिजन पार्कचे आज लोकार्पण करण्यात येत आहे. लवकरच कळवा येथे नक्षत्र उद्यान विकसित केले जाईल. एकेक संकल्पना घेऊन विकसित होत असलेल्या या उद्यानांसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाण्यात दिली. मानपाडा येथील हाईड पार्कसमोर असलेल्या राजमाता जिजाऊ उद्यानाचे लोकार्पण सोमवारी दुपारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर हरिश्चंद्र पाटील, महापालिका आयुक्त सौरभ राव उपस्थित होते. लोकार्पण केल्यावर सर्व मान्यवरांनी या उद्यानात फिरून तेथील झाडे, औषधी वनस्पती, नागरिकांसाठी असलेल्या सुविधा यांची पाहणी केली.

रस्त्यावरून या उद्यानाच्या आत आल्यावर आपल्याला हवेतील फरक स्पष्टपणे जाणवतो. इथल्या औषधी वनस्पतींचे गुणधर्म ऐकल्यावर व्याधीमुक्त होण्यासाठी या उद्यानाची सैर आवश्यक असल्याचे लक्षात येते. व्याधीमुक्त होण्यासाठी या ऑक्सिजन पार्कची नागरिकांना मदत होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

ग्लोबल वॉर्मिंगमुळे पावसाचे बदलेले वेळापत्रक आपण पाहतो आहोत. मराठवाड्यात तर अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटात सापडलेला आहे. त्याला राज्य सरकारने मदतीचा हात दिला आहे. त्याला दिलासा देण्याचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. आपण शहरातील नागरिकांनीही याची जाणीव ठेवली पाहिजे, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

ठाणे शहर बदलतेय. डिसेंबरपर्यंत मेट्रोचा पहिला टप्पा सुरू होईल. रस्ते रुंद होत आहेत, रिंग मेट्रोचे काम सुरू झाले आहे. मुक्त मार्ग, भुयारी मार्ग या प्रकल्पांमुळे विकसित ठाणे, हरित ठाणे अशी शहराची ओळख निर्माण होते आहे. ठाण्यात कावेसर, लोकमान्य नगर, नागला बंदर आदी ठिकाणी अर्बन फॉरेस्ट निर्माण करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री हरित ठाणे अभियानात गेल्यावर्षी सव्वा लाख झाडे लावण्यात आली. यंदा ते लक्ष्य दोन लाखांचे होते. तेही पूर्ण करून दोन लाख ०९ हजार झाडे लावून झाली आहेत. त्यांची वाढही होते आहे. त्यामुळेच ठाणे वरून पाहताना हिरवेगार दिसते आहे, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. त्याचबरोबर, आणखी ऑक्सिजन पार्क तयार करावीत. तसेच, महापालिकेच्या शाळांतील प्रत्येक विद्यार्थ्याने दोन झाडे लावून त्यांचे संगोपन करावे, अशी सूचनाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली. तसेच, एक आव्हान म्हणून या उद्यानाचे काम ठाणे महापालिकेचे उद्यान अधिक्षक केदार पाटील यांनी हाती घेतले आणि ते पूर्ण केले त्याबद्दल उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

या सोहळ्याचे प्रास्ताविक करताना, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी राजमाता जिजाऊ उद्यानाची माहिती दिली. येथे चार-पाच दिवसांपूर्वी लावलेल्या रोपट्यापासून १०० वर्षे जुना वृक्ष आहे. साडेतीन एकर जागेत नवीन संकल्पनेसह हे उद्यान साकारले आहे. २७ ऑगस्ट रोजी मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या उद्यानाचा नव्याने विकास करण्याचे निर्देश दिले होते. त्यासाठी त्यांची चार कोटी रुपयांचा निधीही उपलब्ध करून दिला. आज त्याचे लोकार्पण होत आहे, ही मनाला समाधान देणारी गोष्ट असल्याचे प्रतिपादन आयुक्त सौरभ राव यांनी केले. ठाणेकरांना विविध प्रकारच्या समस्या त्रास देत आहेत. आम्ही त्यातील एकेका समस्येवर तोडगा काढण्याचे प्रयत्न करतो आहोत, असेही राव म्हणाले.

याप्रसंगी, उद्यान अधिक्षक केदार पाटील, रचनाकार प्रणव अनायल आणि जुईली मांजरेकर, वृक्ष मित्र आनंद पाटील यांचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सोहळ्यास परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### उद्यानाविषयी माहिती

- ठाणे महानगरपालिका वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत हिरानंदानी मेडोज परिसरात साडेतीन एकर क्षेत्रफळात राजमाता जिजाऊ उद्यान आहे.
- या उद्यानाची निर्मिती महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत एकात्मिक उद्यान विकास कार्यक्रमाअंतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान विकसित करणेकरिता शासनाकडील प्राप्त निधीतून करण्यात आली आहे.
- या उद्यानात दुर्मिळ वृक्ष तसेच गुडमार, अडुळसा, हळद, सिट्रोनेला, डिकेमाली, कापूर, बारतोंडी, अंबाडा, गोकर्ण, जायफळ, दमवेल, आपटा, बेल, रुद्राक्ष, शेर, भद्राक्ष, निरगुडी, गुळवेल इ. सारख्या औषधी वनस्पती व शोभिवंत फुलझाडे यांच्या १०० हून अधिक प्रजातींची एकूण १५००० झाडांची लागवड करण्यात आलेली आहे.
- औषधी वनस्पतींच्या लागवडीसह आयुर्वेदाची देवता धन्वंतरी तसेच आयुर्वेदाचे जनक आचार्य चरक व आचार्य सुश्रुत यांचेही शिल्प उभारण्यात आलेले आहे.
- तसेच या ठिकाणी कृत्रिम तलावदेखील साकारण्यात आला असून यात विविध जल वनस्पतींची लागवड करण्यात आलेली आहे.
- येथील बहुतांश झाडांना क्यू आर कोडसह माहिती फलक लावण्यात आले आहेत व त्या क्यू आर कोडला स्कॅन करुन नागरिकांस झाडांबाबत माहिती मिळेल.
- या उद्यानाचा एक फेरफटका मारल्यास सुमारे ५०० मीटर अंतर पार होणार असून त्याकरिता टप्याटप्याने विशिष्ट अंतरावर फलक लावण्यात आलेले आहेत.
- पक्ष्यांना त्रास होणार नाही अशा पध्दतीने विद्युत दिव्यांची सोयही करण्यात आलेली आहे.
- उद्यान साकारताना तेथील प्राचीन वड व पिंपळ वृक्षांचे संवर्धन व सुशोभिकरण करण्यात आले आहे.

# घाटकोपर स्टेशन परिसरात दिवाळी खरेदीसाठी नागरिकांची गर्दी; वाहतूक कोंडी वाढली

## नियंत्रण मिळवण्यासाठी घाटकोपर पोलिस गस्त भूमिकेत



**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर, केतन भोज**

घाटकोपर स्टेशन परिसरात दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली असून, त्यामुळे परिसरातील वाहतूक कोंडी वाढली आहे. विशेषतः घाटकोपर पश्चिमेकडील महात्मा गांधी रोडवर गेल्या आठवड्या भरापासून खरेदीदारांची सततची वर्दळ पाहायला मिळत आहे.

पश्चिमेकडून पूर्वेकडे तसेच स्टेशनमार्गावरून भटवाडी, असल्फा नगर आणि एल. बी. एस. मार्गाकडे जाणाऱ्या वाहनांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन घाटकोपर पोलिसांनी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना हाती घेतल्या आहेत.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शरद शेटे , सहायक पोलिस निरीक्षक लालासाहेब डाके व त्यांचे पथक दिवस-रात्र गस्त ठेवत आहेत. विशेषतः सायंकाळी पाचनंतर वाढणारी गर्दी व वाहतूक कोंडी नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांचे विशेष लक्ष केंद्रित आहे."दिवाळीचा उत्सव आनंदात आणि शांततेत पार पडावा, तसेच कायदा व सुव्यवस्था राखली जावी यासाठी आम्ही दिवाळी संपेपर्यंत वाहतूक नियंत्रणावर भर देत आहोत," उसळलेल्या गर्दीचा चोर देखील फायदा घेत असतात. नागरिकांनी शक्यतो गर्दीच्या ठिकाणी महागडे दागिने , पैसे यांचा वापर करू नये असे आवाहन देखील आम्ही करत आहोत.. तसेच पोलिसांची गस्त वाढवली असल्याचे पोलिस उप निरीक्षक शरद शेटे यांनी सांगितले.

# शरद पवार राष्ट्रवादीच्या वतीने ' काळी दिवाळी' आंदोलन

## अतिवृष्टि बाधिताना शासनाकाडून मदत न मिळाल्याचा निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषन

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

वाशिम:-शासनाने शेतकऱ्याची फसवणूक केली. अजूनही अतिवृष्टीची मदत शेतकऱ्याच्या हाती आली नसल्याने त्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या वतीने वाशिम येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जिल्हाध्यक्ष बाबाराव खडसे पाटील यांच्या नेतृत्वात वाशिम जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अरविंद पाटील इंगोले, वाशिम नगर परिषद माजी उपाध्यक्ष माधवराव अंभोरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये काळे दिवाळी आंदोलन छेडण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी वाशिम यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मागील महिन्यात झालेल्या अतिवृष्टीच्या संकटांनी व शासनाच्या फसव्या मदतीच्या सुलतानी संकटाने महाराष्ट्रातील शेतकरी बेजार आहेत या नाकर्त्या सरकारने मदत जाहीर करून दिवाळीपूर्वी मदतीचे पैसे खात्यात टाकू अशी आश्वासन दिले मात्र अद्याप शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही त्यामुळे शेतकऱ्याचे दिवाळी अंधारात जाणार




असून त्याला सर्वस्वी जबाबदार महायुतीचे सरकार आहे सरकारने निव्वळ आकड्यांची धुळे फेक करून शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. एन संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणे गरजेचे असताना हे सरकार प्रचारात मग्न आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरदचंद्र पवार गटाचे वाशिम जिल्ह्याच्या वतीने सरकार विरोधात काळी दिवाळी आंदोलन छेडण्यात आले. याबाबत राज्य शासनाने गांभीर यांनी लक्ष घालून शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी असे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून स्पष्ट केले. निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी स्वीकारले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष बाबुराव पाटील खडसे, जि.प. माजी अध्यक्ष अरविंद पाटील इंगोले, ज्येष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे, जि.प.सदस्य अमित पाटील खडसे, जिल्हा उपाध्यक्ष कैलासराव खानझोडे, डॉ नारायणराव शेंडगे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष वैशालीताई मेश्राम, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वाशिमचे रमेश पाटील गोटे, कारंजाचे मनीष कानकिरड, मानोराचे काशीराम राठोड, मंगळूर पीर चे राजेश पाटील टोपले, रिसोड चे गजाननराव सरनाईक, मालेगाव चे भगवानराव शिंदे, रायुकांचे रिसोड तालुका अध्यक्ष माधवराव शेवाळे माजी? प.स.सदस्य डॉ.गजानन बाजड, मुरलीधर जुनघरे, अनंता देशमुख, गजानन शिंदे, महेश बोरकर, किशोर लहाने, संदीप पाचरणे, सामाजिक न्याय कक्षाचे जिल्हाध्यक्ष गौतम कांबळे, रा.का. सेवादल जिल्हाध्यक्ष गणपतराव भरकड, अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष इम्रान फकीरावाले, शेषराव वाझुळकर, शिवा घुगे, चेतन सोळंके, मनोज अडागळे, दिनकर पुंड, गणेश चोपडे, जयंतराव इरतकर, गुलाबराव पाटील, मनोज उफाडे, मालेगाव पं.स.चे माझी उपसभापती विजय घोडे, आसिफ पठाण यांच्यासह शेकडो कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते.

# सणसर येथील युवा उदयोजक विजय काळे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ५० हजारांची मदत

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय**

खासदार सुनेत्रा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सणसर येथील सामाजिक कार्यकर्ते व युवा उद्योजक गणेश अर्थमुव्हर्स चे मालक विजय काळे यांच्यावतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये पूरग्रस्तांसाठी ५० हजार रुपयांची मदत देण्यात आली. मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे यावर्षी राज्याच्या अनेक भागात पूर परिस्थिती निर्माण होऊन शेतकरी व ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पूरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन मुख्यमंत्री




देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार एकनाथभाई शिंदे यांनी केल्यानंतर सणसर येथील सामाजिक कार्यकर्ते युवा उदयोजक विजय काळे यांनी खासदार सुनेत्रा पवार यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ५० हजार रुपयांचा धनादेश बारामती येथील एका कार्यक्रमात सुपूर्त केला.








